ePaper
कोरोनानं टेन्शन वाढवलं, राज्यात 1,967 नव्या कोरोनाबाधितांची नोंद
वर्ष - 8 । अंक - 306 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™

## आतील पानांत


- २७ वर्षांनंतर आफ्रिकेचा विजय!
- ऑस्ट्रेलियाचा पराभव कुणामुळे झाला?
- विमान दुर्घटनेनंतर सरकार अलर्ट
- तर २००० लोकांचा मृत्यू झाला असता


www.mahaenews.com । रविवार, दि. 15 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## हॉस्टेलच्या छतावर अपघातग्रस्त विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' : छाननी सुरू, अनेक महत्त्वाच्या बाबी उघड होणार!

# 'ब्लॅक बॉक्स' सापडला! गूढ उलगडणार!

## अहमदाबाद येथील अपघातग्रस्त विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' हाती आल्याने तपासाला दिशा आणि गती !




। अहमदाबाद / नवी दिल्ली / मुंबई ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**अहमदाबादवरून लंडनला निघालेल्या प्रवासी विमानाचा भीषण आणि भयावह अपघात पाहून संपूर्ण जग हादरले आणि हळहळले. हा अपघात नेमका कशामुळे झाला? याचा उलगडाही होणे अवघड होऊन बसले आहे. अशातच या विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' सापडल्याने यापुढे तपासाची गती आणि दिशा योग्य दिशेने राहील, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या अपघातात संदर्भातील अनेक महत्त्वाच्या बाबी आता उघडकीस येऊन एकूणच विमान अपघाताचे गूढ उकलणार आहे.**

### विमानाचा 'डीव्हीआर' देखील हात...

अहमदाबाद येथे झालेल्या 'एअर इंडिया'च्या विमान अपघातानंतर जवळजवळ २७ तासांनी विमान अपघात तपास ब्युरोला (ए.ए.आय.बी.) विमानाचा ब्लॅक बॉक्स (डीएफडीआर) सापडला आहे. हा,'ब्लॅक बॉक्स' बी. जे. मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहाच्या छतावर सापडला, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### विमान अपघाताचे नेमके कारण..

या 'ब्लॅक बॉक्स' च्या विश्लेषणातून अपघाताचे नेमके कारण आता शोधता येणे शक्य आहे आणि नागरिकांच्या मनात असलेला गोंधळ आणि संभ्रम त्यामुळे संपण्यास मदत होईल. अपघातस्थळी असलेल्या ढिगाऱ्यातून 'डिजिटल व्हीडिओ रेकॉर्डर' देखील सापडला आहे, असे तपास यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### 270 मृतदेह बाहेर..

या विमान अपघातामध्ये मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली असून आतापर्यंत २७० मृतदेह हाती लागले आहेत. सात जणांचे मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. दरम्यान, 'ड्रीमलाइनर' विमानांची तपासणी करण्याचे आदेश 'डीजीसीए' ने दिले आहेत. 'एअर इंडिया' च्या ताफ्यात २६ बोईंग- ७८७-८ आणि ७ बोईंग-७८७-९ प्रकारची विमाने आहेत, अशी माहिती वृत्त संस्थेने दिली आहे.

### मोदींनी घेतली एकमेव जिवंत व्यक्तीची भेट

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अपघातात जिवंत राहिलेल्या एकमेव व्यक्तीची म्हणजे विश्वासकुमार रमेश यांची भेट घेतली, त्याची विचारपूस केली आणि संवाद साधला. तो ब्रिटिश नागरिक आहे. अहमदाबाद येथील सिव्हिल रुग्णालयात भेट देऊन विमान अपघातातील जखमी नागरिकांची विचारपूस नरेंद्र मोदी यांनी केली.

### जखमींवर उपचार..

अपघातातील २५ जखमींवर सिव्हिल रुग्णालयातील सी-१७ वॉर्डामध्ये उपचार सुरू आहेत. मोदी यांनी यावेळी डॉक्टरांशीही संवाद साधला. ज्या होस्टेलवर विमान जाऊन आदळले, तेथील अनेक डॉक्टर्सही जखमी असून त्यांच्याशीही मोदींनी प्रत्यक्ष संपर्क साधून विचारपूस केली.

### तपास यंत्रणा 'ॲक्शन मोड' वर!

विविध केंद्रीय तपास संस्थांनी विमान दुर्घटनास्थळाला भेट दिली. राष्ट्रीय तपास संस्थेसह (एनआयए) इतर केंद्रीय तपास संस्थांनी विमान अपघाताच्या स्थळाला भेट दिली. विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) ने या दुर्घटनेची चौकशी सुरू केली आहे. दुर्घटनाग्रस्त विमानाचे अवशेष तसेच विमान ज्या इमारतीवर कोसळले, तिची नासधूस झाल्याने पसरलेला ढिगारा या गोष्टी तेथून हटविण्यात आल्या. अनेक मृतदेह पूर्णपणे जळाल्याने त्यांची ओळख पटवणे अशक्य आहे. या अपघातात मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्याही मृतदेहाची ओळख अजून पटू शकलेली नाही. मृतदेह ताब्यात मिळावेत म्हणून अनेक नातेवाईकांची डी. एन. ए. चाचणी सुद्धा करण्यात आली आहे.

### 'मे डे' कॉल म्हणजे नेमके असते तरी काय?

अहमदाबाद विमान दुर्घटनेतील अनुभवी पायलटने ए टी सी म्हणजे एअर ट्रॅफिक कंट्रोलला तातडीच्या मदतीचा "मे-डे" कॉल दिला होता, असे संवाद विमान दुर्घटनेनंतर सारखे ऐकू येत होते. 'मे डे ' कॉल म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य केलेला आपत्कालीन संदेश, जो पायलट किंवा जहाजाचा कप्तान अत्यंत गंभीर आणि जीवघेण्या संकटाच्या वेळी एअर ट्रॅफिक कंट्रोल किंवा जवळच्या विमानांना देतो. हा कॉल पायलट रेडिओवर ' मे डे, मे डे, मे डे' असे तीनदा उच्चारतो, जेणेकरून संभ्रम टळावा आणि सर्वांना ही आपत्कालीन परिस्थिती समजावी. त्यानंतर सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात येतात. इंजिन फेल्युअर, विमानात आग, अचानक नियंत्रण गमावणे, तांत्रिक बिघाड, किंवा वैद्यकीय आणीबाणी अशा जीवघेण्या परिस्थितीत हा कॉल दिला जातो.

# 'जलकोंडी'ची उपमुख्यमंत्र्यांकडून दखल!

## पाणी साठल्यास मेट्रोचे काम करणाऱ्या कंपनीला दंड

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मेट्रोच्या हिंजवडी-शिवाजीनगर मार्गिकेच्या कामामुळे हिंजवडी आयटी पार्क परिसरात पाणी साठत आहे. त्यामुळे पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ होण्यापूर्वी अडथळे दूर झाले नाहीत, तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मेट्रो मार्गाचे काम करणाऱ्या कंपनीला दहा कोटी रुपये दंडाची नोटीस पाठवावी,' असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी दिले.**



पालखी सोहळा पूर्वतयारी आणि करोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार यांनी आढावा बैठक घेतली. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना पवार यांनी हे आदेश दिले.'गेल्या काही दिवसांपासून शहरात प्रमाणापेक्षा जास्त पाऊस होत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पाणी साचत असून, वाहतूक कोंडी होत आहे. पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पाणी साचणाऱ्या ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. त्यामध्ये हद्दीचा प्रश्न उपस्थित न करता दोन्ही महापालिका आणि महामेट्रो यांनी कार्यवाही करावी,' असे पवार यांनी स्पष्ट केले.'सासवड येथील दिवे घाटात पाणी आणि चिखल मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येत आहे. त्या ठिकाणी नाल्यांचे काम सुरू आहे. हे काम तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, पावसामुळे खडक ठिसूळ झाला असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे डोंगरांच्या भागात लोखंडी अडथळे लावून हे प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करावे, अशा सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत,' असेही पवार म्हणाले. पालखी सोहळा पूर्वतयारी आणि करोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार यांनी आढावा बैठक घेतली.

विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना पवार यांनी हे आदेश दिले.'गेल्या काही दिवसांपासून शहरात प्रमाणापेक्षा जास्त पाऊस होत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पाणी साचत असून, वाहतूक कोंडी होत आहे. पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पाणी साचणाऱ्या ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. त्यामध्ये हद्दीचा प्रश्न उपस्थित न करता दोन्ही महापालिका आणि महामेट्रो यांनी कार्यवाही करावी,' असे पवार यांनी स्पष्ट केले.'सासवड येथील दिवे घाटात पाणी आणि चिखल मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येत आहे. त्या ठिकाणी नाल्यांचे काम सुरू आहे. हे काम तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, पावसामुळे खडक ठिसूळ झाला असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. पंढरपूरकडे मार्गस्थ होण्यापूर्वी अडथळे दूर झाले नाहीत, तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मेट्रो मार्गाचे काम करणाऱ्या कंपनीला दहा कोटी रुपये दंडाची नोटीस पाठवावी,' असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी दिले.

### काम तातडीने करण्याच्या सूचना

पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पाणी साचणाऱ्या ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. त्यामध्ये हद्दीचा प्रश्न उपस्थित न करता दोन्ही महापालिका आणि महामेट्रो यांनी कार्यवाही करावी,' असे पवार यांनी स्पष्ट केले.'सासवड येथील दिवे घाटात पाणी आणि चिखल मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येत आहे. त्या ठिकाणी नाल्यांचे काम सुरू आहे. हे काम तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, पावसामुळे खडक ठिसूळ झाला असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे डोंगरांच्या भागात लोखंडी अडथळे लावून हे प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करावे, अशा सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत,' असेही पवार म्हणाले.

# कोथरूड, वारजेत 'कचरा कोंडी!

## रॅम्प महिन्यांसाठी देण्याबाबत पालिकेचे मेट्रोला पत्र

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोथरूड कचरा डेपो येथील कचरा रॅम्प १५ मेपासून बंद करण्यात आल्यानंतर कोथरूड आणि वारजे भागात कचऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मेट्रोला डेपो तयार करण्यासाठी दिलेली कचरा रॅम्पची जागा चार महिन्यांसाठी पुन्हा महापालिकेकडे देण्याबाबतचे पत्र महापालिकेने महामेट्रोला दिले आहे. या मागणीला महामेट्रोने सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याने महापालिकेकडून लवकरच या कचरा रॅम्पवर कचरा विलगीकरण आणि हस्तांतराचे काम केले जाणार आहे.**



गेल्या महिन्यात कोथरूड येथील कचरा डेपोमधील कचरा संकलनाची जागा महापालिकेने मेट्रोला डेपोच्या विकसनासाठी दिली आहे. मात्र, ही जागा दिल्यानंतर या भागातील कचरा गोळा करण्याच्या कामावर परिणाम झाला. त्यामुळे ही जागा चार महिन्यांसाठी परत देण्यासाठी मेट्रो प्रशासनाबरोबर पत्रव्यवहार करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी दिली.कोथरूड येथे असलेला कचरा डेपो काही वर्षांपूर्वी उरुळी देवाची आणि फुरसुंगी येथे हलविण्यात आला. वनाज ते रामवाडी मेट्रो प्रकल्प तयार करताना कचरा डेपोची जागा महापालिकेने महामेट्रोला डेपो तयार करण्यासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला. कोथरूड कचरा डेपो बंद झाल्यानंतर महापालिकेने येथील ३० गुंठे जागेवर कचरा हस्तांतर रॅम्प तसाच ठेवला होता. येथे वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत गोळा होणारा ओला आणि सुका कचरा संकलित करण्यात येत होता. गेल्या महिन्यात महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी घनकचरा विभागाला कोथरूडचा कचरा रॅम्प तातडीने बंद करण्याचा आदेश दिला. त्यानुसार १५ मेपासून हा कचरा रॅम्प बंद करण्यात आला. येथील कचरा महापालिकेच्या घोले रस्ता आणि कात्रज येथील रॅम्पवर पाठविण्यात येतो.'गेल्या दोन आठवड्यांपासून शहर आणि जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाल्याने शेतामध्ये चिखल झाला आहे. त्यामुळे कचरा रॅम्पवरून खत बनविण्यासाठी शेतकऱ्यांनी महापालिकेचा कचरा घेणे थांबविले होते. या प्रकारामुळे कोथरूड, वारजे परिसरात कचऱ्याचे ढीग लागले. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या घनकचरा विभागाने महामेट्रो प्रशासनाला पत्र देऊन कोथरूड येथील कचरा रॅम्पची जागा पुढील चार महिने वापरण्यास मिळावी, अशी विनंती केली आहे. या विनंतीला मेट्रोने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे लवकरच कोथरूड येथील कचरा रॅम्पवर कचरा विलगीकरण व हस्तांतर करण्याचे काम पुन्हा सुरू होईल.

### बावधनला रॅम्प बांधण्यात अडचण

'महापालिकेने रॅम्प हटवून ही जागा मेट्रोला डेपो विकसित करण्यासाठी द्यावी, यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून मेट्रोचा पाठपुरावा सुरू होता. कोथरूड येथील कचरा रॅम्पची पर्यायी व्यवस्था म्हणून बावधन येथील ४० गुंठे जागेत महापालिकेने रॅम्प विकसनासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ही जागा एनडीए विमानतळाच्या फनेल झोनमध्ये येते.

## पिंपरी महापालिका निवडणुक रणधुमाळी

# एका प्रभागात सरासरी 53 हजार मतदार!

## महापालिका निवडणूक विभागाचे कामकाज सुरू

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका चार सदस्यीय एक प्रभाग हा 49 हजार ते 59 हजारांचा असणार आहे. सरासरी 53 हजार मतदार एका प्रभागात असतील. प्रभाग रचनेचे काम महापालिकेच्या निवडणूक विभागाने सुरू केले असून, आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.**



शहराची सन 2011 ची जनगणना विचारात घेऊन प्रत्येक प्रभागातील मतदारसंख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यादृष्टीने प्रगणक गट (ब्लॉक) जुळवून प्रभाग तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी गुगल अर्थ मॅपचा आधार घेण्यात येणार आहे. प्रभाग रचना तयार करण्यासाठी 37 दिवसांची मुदत आहे.

त्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यात सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांच्यासह स्थापत्य, नगररचना, बांधकाम परवानगी आदी विभागाचे अधिकाऱ्यांची समावेश आहे. प्रभाग रचनेचे प्रत्यक्ष कामकाज महापालिकेने सुरू केले आहे. त्यासाठी प्राथमिक बैठका झाल्या आहेत. आयुक्तांनी फेब्रुवारी 2017 च्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागांची माहिती घेतली. त्याबाबत प्राथमिक चर्चा करण्यात आली.

शहराची 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 17 लाख 29 हजार 359 आहे. त्यानुसार, प्रत्येक प्रभागात किमान 49 हजार आणि कमाल 59 हजार मतदार संख्येचा समावेश केला जाणार आहे. सरासरी 53 हजार मतदारांचे प्रमाण एका प्रभागात असतील.

त्या दृष्टीने प्रभागरचना नकाशा तयार केला जाणार आहे. त्यासाठी 2011 च्या जनगणनेची माहिती तपासणे, स्थळ पाहणी करणे, गुगल मॅपवर प्रभाग नकाशे तयार करणे आदी प्रक्रिया केली जाणार आहे. त्या कामकाजासह प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीने स्वाक्षर्‍या करणे, ही सर्व प्रक्रिया 7 जुलैपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

- शहरात 16 लाख 75 हजार 654 मतदार
- पिंपरी विधानसभा : 3 लाख 91 हजार 607 मतदार
- चिंचवड विधानसभा: 6 लाख 63 हजार 622 मतदार
- भोसरी विधानसभा: 6 लाख 8 हजार 425 मतदार
- भोर विधानसभा (ताथवडे) : 12 हजार मतदार

### 22 जुलैला प्रभाग रचना प्रसिद्ध होणार

प्रारूप प्रभागरचना राज्य निवडणूक आयोगाकडे 8 ते 10 जुलैला पालिका आयुक्त सिंह यांच्याकडून पाठविला जाईल. आयोगाकडून प्रभाग रचनेला मान्यता मिळाल्यानंतर 22 जुलैला प्रभागरचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर त्या दिवसापासून दहा दिवस म्हणजे 31 जुलैपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जातील.

त्यावर 1 ते 11 ऑगस्ट अशी म्हणजे 11 दिवस सुनावणी घेतली जाईल. त्यानंतर हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम केलेली प्रभागरचना 12 ते 18 ऑगस्ट या कालावधीत निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी पाठविली जाईल. राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केलेली प्रभागरचना अधिसूचनेद्वारे 29 ऑगस्ट ते 4 सप्टेंबर या कालावधीत प्रसिद्ध केली जाईल. तेव्हा प्रभाग रचनेचे कामकाज संपणार आहे.

> पिंपरी-चिंचवड शहरात चार सदस्यीय 32 प्रभाग रचना तयार करण्यासाठी प्राथमिक कामकाज सुरू करण्यात आले आहे. प्रभागरचना तयार करताना चिखली-तळवडेपासून सुरुवात करून सांगवी येथे समाप्ती केली जाईल. त्या क्रमाने प्रभागांना क्रमांक दिले जातील. आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रभागरचना तयार केली जाईल. त्यादृष्टीने मनुष्यबळ नेमले जाणार आहे. या कामकाजाच्या समितीचे अध्यक्ष आयुक्त आहेत.
>
> **- अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, निवडणूक विभाग, महापालिका

### प्रभाग रचनेनंतर आरक्षण सोडत

पिंपरी-चिंचवड शहरातील चार सदस्यीय 32 प्रभागांची रचना 4 सप्टेंबरपर्यंत अंतिम होईल. त्यानंतर महिला तसेच, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (एसटी आणि एसटी) जागेसाठी आरक्षण सोडत काढली जाईल.

---

# बैलजोडीचा मान देण्याची परंपरा खंडीत!

## आषाढी वारीआधी देहू संस्थानचा ऐतिहासिक निर्णय

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचा कार्यक्रम देहू संस्थानकडून जाहीर झाला असून, येत्या 18 जूनला जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी ही देहूतून पंढरपूर कडे प्रस्थान ठेवणार आहे. त्याआधी देहू संस्थानने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून संत तुकाराम महाराजांच्या आषाढी वारीचा पालखी रथ ओढण्यासाठी देहू संस्थानने तीन नव्या बैलजोड्या खरेदी केल्या आहे. त्यामुळे पालखी सोहळ्यासाठी बैलजोडीचा मान देण्याची वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा खंडित झाली आहे.**



जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा 340 वा पालखी सोहळा अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यासाठी देहू संस्थानच्या तयारीला वेग आला आहे. यावर्षी देहू संस्थांनकडून एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. दरवर्षी तुकोबांच्या पादुका पंढरपूरला जाण्यासाठी पालखी रथात विराजमान होतात आणि हा रथ ओढण्यासाठी पुणे जिल्ह्यातून विविध बैलजोडयांना हा मान दिला जायचा. परंतु यावर्षी पासून देहू संस्थानने बाहेरून बैलजोडी न मागवता थेट संस्थानच्या मालकीची बैलजोडी खरेदी करून ती रथाला जुंपण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे यावर्षी पासून बैलजोडी साठी अर्ज मागविण्यात आले नसून थेट पालखी सोहळ्याला संस्थानच्या मालकीच्या बैलजोडी तुकोबांचा पालखी रथ ओढणार आहेत.


यावर्षी देहू संस्थांच्या संत तुकोबांच्या पालखी सोहळ्यात एकूण तीन बैल जोड्या घेण्यात आल्या आहेत. यापैकी दोन रथाला व एक चौघड्याचे सारथ्य करतील. या तिन्ही बैलजोड्या वेगवेगळ्या ठिकाणाहून येणार आहे. पालखी प्रस्थान सोहळ्याच्या आदल्या दिवशी देहूमध्ये या बैल जोड्या येतील. ग्रामस्थ तसेच संस्थांच्या वतीने या बैल जोड्यांची जंगी मिरवणूक काढली जाणार आहे.

### पालखी मार्गावर वृक्षारोपण

18 जून रोजी संत तुकाराम महाराजांचे देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान आहे. यावर्षी संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्या दरम्यान रस्त्याने ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. नवीन पालखी मार्ग हा मोठा झाल्याने त्या मार्गावर वारकऱ्यांना सावलीसाठी झाडे नाहीत. त्यामुळे ठिकठिकाणी वृक्षारोपण करून येणाऱ्या पुढील काही वर्षात याची मोठी डेरेदार झाडे तयार होतील आणि वारकऱ्यांना भविष्यात सावली निर्माण होईल असा निर्धार या वारी सोहळ्यात देहू संस्थानकडून करण्यात आला आहे.

> संत तुकाराम महाराज संस्थान वतीने पालखी व चौघड्याचे सारथ्य करण्यासाठी बैल जोडी घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. पालखी प्रस्थान सोहळ्याच्या आदल्या दिवशी या बैलजोडी देहू नगरीमध्ये दाखल होतील जंगी मिरवणुकीमध्ये या बैलजोडींचे स्वागत ग्रामस्थ तथा संस्थांच्या वतीने केले जाईल.
>
> **-जालिंदर मोरे,** अध्यक्ष, संत तुकाराम महाराज संस्थान देहू.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### जेथे भगवंताचें नामस्मरण। तेथे सर्व संतांचें ठाण॥

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास॥ परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ॥ जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ॥ विषयी एकजीव झालो जाण। सुटता न सुटे आपण जाण ॥

मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ॥ अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण ॥ सुख-दु:ख, विपत्ति-आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती ॥ आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण॥

आता करी शूर मन । मायेसी हटवावे आपण ॥ जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें ॥ एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान॥ ज्याच्यांत मानावें मी सुख । त्याच्यातच उद्भवतें दु:ख ॥ नराचा होय नारायण । जर न चुकला मार्ग जाण ॥

जेथे ठेवावी आस । त्याचे बनावें लागतें दास ॥ देह तो पंचभूतांचा । त्याचा भरवसा न मानावा फारसा॥ मी तुम्हांस सांगतों हित । दृश्यांत न ठेवावें चित्त ॥ दृश्य वस्तु नाशिवंत असते । भगवत्कृपेने समाधान येतें॥

परिस्थिति नसे बंधनास कारण । असे आपलेच मनाची ठेवण ॥ देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण ॥ विषयाचा नाही झाला जोंवर त्याग । तोंवर रामसेवा नाही घडत सांग ॥ आपलें आत्यंतिक हित । हेंच खरा स्वार्थ जाण ॥

चित्तीं जे विषयापासून सुटले । ते आनंदासी आले ॥ रामनाम प्रेमयुक्त चाले धणी । त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ॥ द्रव्यदारावर्जित जाण । ही खरी संताची खूण॥ सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी । त्याला नाही दुसरी सरी ॥

आल्यागेल्यास द्यावे अन्नदान । मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति । यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ॥ न धरावी जगाची आस । तोच होऊ पाहे रामदास ॥

**बोधवचन:- देहासकट माझा प्रपंच। रामा केला तुला अर्पण॥ ऐसें वाटत जावें चित्तीं। कृपा करील रघुपति॥**




**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

**संस्थापक, संपादक**


**गेला आठवडा कमालीच्या नाट्यपूर्ण आणि धक्कादायक घटनांनी भरला होता. त्यात रेल्वे अपघात, विमान अपघात, इस्रायलचा इराणवर हल्ला अशा खच्चून घटनांचा समावेश होतो. या सगळ्या घटनांमध्ये भाजपप्रणित नरेंद्र मोदी सरकारने सलग अकरा वर्षे पूर्ण केल्याची घटना.. अर्थात् एक प्रकरण पूर्ण झाले. पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या नंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे नरेंद्र मोदी हे दुसरे पंतप्रधान होत. त्यांनी आणि भाजपाने मनात आणले तर सलग १५ वर्षे पंतप्रधान असणारे ते पहिले प्रधानमंत्री असतील !**

# मोदी सरकारची अकरा वर्षे, देशाच्या अपेक्षा वाढवणारी!



### एकाधिकार आणि मनमानीचे पर्व..

जनतेने सलग तिसऱ्यांदा भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांना सत्ता स्थानावर नेले आहे. काही मित्र बदलले, पण भाजपाच्या सत्ताकारण आणि राजकारणात बदल झाला नाही. सतत निवडणुकीची रचना समजावून घेत त्यासाठी प्रयत्न करणे आणि निवडणुकीला सामोरे जाताना अत्यंत विचारपूर्वक प्रयत्न करणे, हा त्यांचा स्वभाव आहे. अर्थात् पंतप्रधान मोदी आणि त्यांची कार्यशैली हा आता अंगवळणी पडल्याने टीकेचा विषयही होत आहे. एकाधिकार आणि मनमानी असे त्यांच्या वागण्याचे विश्लेषण केले जात आहे.

### मोदींची पोलादी पकड अभेद्य..

मुख्यमंत्रिपद वगळता कोणत्याही केंद्रीय पदाचा अनुभव नसताना थेट सर्वोच्चपदी विराजमान झाल्यानंतर दिल्लीतली होयबा मंडळी, विरोधक आणि प्रसंगी पक्षातील तत्कालीन वरिष्ठांची मक्तेदारी मोडून काढत सरकार, पक्ष आणि जनमानसावरही मोदींनी बसवलेली पोलादी पकड ११ वर्षात जवळपास अभेद्य बनली आहे. 'एक देश, एक निवडणूक' , 'एक देश, एक कर' किंवा एक देश,एक भाषा अशा घोषणा व्यासपीठांवर गाजत असल्या, तरी एक पक्ष, एक नेता ही घोषणाच सर्वांच्या मुळाशी पुन्हा ठेवली आहे. किंबहुना, पूर्वी मोदी यांना आव्हान देण्याची स्वप्ने पाहणाऱ्यांनीही हे वास्तव सहज स्वीकारले असून, त्यांचे वारसदार म्हणवून घेण्याचाही अनेकांनी धसका घेतल्याचे दिसते. कोणतेही अपयश अंगी लावून न घेणारी प्रतिमा, जनतेशी थेट संवाद, नवनव्या घोषणांची आतषबाजी, माध्यमे-समाजमाध्यमांवर पकड, राजकीय पराभव सहजी न स्वीकारणारी महत्त्वाकांक्षा आणि राजकीय चाणाक्षपणा अशा या नेतृत्वाच्या जमेच्या बाजू आहेत याचा विचार केला पाहिजे.

### सत्ताधिकाऱ्यांकडून जयघोष, विरोधकांना सुतक..

आपल्या कामगिरीचा सत्तापक्षाकडून सध्या जयघोष सुरू असून, विरोधकांकडून सरकारच्या चुकांचे पाढे वाचण्यात येत आहेत. सरकारची कामगिरी मोजताना देशाच्या व्यवस्थेला वळण देणाऱ्या राजकीय आघाडीवरील निर्णयांचा उल्लेख करावा लागेल. त्यामध्ये जम्मू-काश्मीरला वेगळे स्थान देणारे घटनेतील ३७० वे कलम वगळणे, अयोध्येत श्री राम मंदिराची उभारणी आणि गोवंश हत्याबंदी, हे निर्णय पक्षाच्या विचारसरणीशी सुसंगत असून, ते मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि पक्षाच्या निष्ठावान मतदारांना सुखावणारे ठरले.

### उजवी विचारसरणी स्पष्ट..

महिला आरक्षण विधेयक मंजूर करवून घेऊन सरकारने एक पाऊल पुढे टाकले. ढोबळमानाने भाजप हा उजव्या विचारसरणीचा पक्ष मानला, तरी डाव्या विचारांच्या सरकारांनाही फिके पाडणारे काही कल्याणकारी निर्णय, हे मोदी सरकारचा तळागाळातला पाया भक्कम करणारे ठरले. त्यामध्ये जातनिहाय जनगणनेसह पायाभूत सुविधा, मोफत धान्य योजना, शेतकऱ्यांना मिळणारा निधी, पंतप्रधान आवास योजना, उज्ज्वला गॅस, जनधन बँक खाते अशा डझनावारी वैयक्तिक लाभाच्या योजना सरकारने राबवल्याच; त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे या सर्वांचे वाजतगाजत श्रेय पंतप्रधान मोदी यांना देऊन लाभार्थीच्या मनावर ते बिंबवण्यात सरकार व सत्ताधारी पक्ष यशस्वी ठरले. गेल्या ११ वर्षांमध्ये चार वेळा शेजारी देशांशी संघर्षाचे प्रसंग उद्भवले. त्यामध्ये सर्जिकल स्ट्राइक, बालाकोट हवाई हल्ले, चीनशी संघर्ष आणि पहलगाम हल्ल्यानंतर राबवलेले 'ऑपरेशन सिंदूर' यांचा समावेश आहे. यांपैकी काही घटनांवरून विरोधकांनी टीकास्त्र सोडले असले, तरी सरकारची कणखर प्रतिमा जनतेच्या मनात ठसविण्यात सत्तापक्षाने कोणतीही कसर सोडली नाही.

### एक टक्का धनाढ्यांकडे चाळीस टक्के संपत्ती..

मोदी सरकारचा कारभार आणि कार्यशैलीबाबत अनेक आक्षेप असणे स्वाभाविक आहे. देश चौथ्या पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला असला, तरी देशातील एक टक्का धनाढ्यांकडे ४० टक्के संपत्तीचे केंद्रीकरण झाले असून, प्रचंड विषमता आणि दरडोई उत्पन्नात जगात तळातले स्थान या चिंतेच्या बाबी आहेत. घटनात्मक संस्था मोडकळीला आल्याची टीका सातत्याने होते, तसेच एकाधिकारशाही, तपास यंत्रणांचा गैरवापर आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांना लक्ष्य करून नंतर सत्तेत पावन करून घेण्यावरून स्वपक्षीयांतही नाराजी दिसते. हा प्रकार कमी करणे किंवा यात सुधारणा करणे आवश्यक आहे. जी मंडळी भ्रष्टाचारी आहेत हे, ओरडून सांगितले गेले, ती आता मांडीला मांडी लावून बसली आहेत.

### प्रश्न बेरोजगारी, आरोग्य, शिक्षणाचे..

नेमका याचा कट्टर भाजपाई मंडळींना राग आहे. या शिवाय देशाला भेडसावणारे रोजगार, महागाई, आरोग्य, शिक्षण, भ्रष्टाचार या विषयांवर फार काही घडले असे वाटत नाही..दिसत नाही. महागाई आणि भ्रष्टाचार ही डोकेदुखी संपवण्याचे आव्हान सरकार पुढे आहे. 'न खाऊंगा, न खाने दूंगा' यातील पहिला भाग ठीक आहे, मात्र दुसरा भाग सत्यात उतरला नाही, खाणारेच आणि ज्यांच्या विरोधात सच्चे भाजपाई लढले, त्यांना आदर द्यावा लागतो आहे. हे वैषम्य आहे. यात बदल केलाच पाहिजे..बाकी राजकारण करताना सत्ताकारण आणि कालांतराने राजकारण पातळीसोडून घसरु नये एवढेच..!

बाकी सत्तेची खुर्ची सगळ्यांचे समाधान करणारी कधीच नसते. मात्र जास्तीजास्त मंडळींचे, सर्वसामान्यांचे, मतदारांचे, गोरगरीब जनतेचे कल्याण करणारे असावे एवढेच!


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वन्यप्राण्यांच्या उपद्रवावर तोडगा काढणार!

## सरकारकडे मागणी करणार: ब्रिगेडिअर सुधीर सावंत

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकरी आणि शेती वन्य प्राण्यांमुळे उद्ध्वस्त होत असून, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री, वनमंत्री आणि ग्रामविकास मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना मागणी करणार असल्याचे माजी खासदार ब्रिगेडिअर सुधीर सावंत यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. वन्य प्राण्यांसाठी जंगलात अन्न, पाणी आणि अन्नसाखळी निर्माण करण्यासाठी सरकारने संशोधन करावे, तसेच वन, कृषी आणि ग्रामविकास खात्याने एकत्रित येऊन याबाबत धोरण ठरवावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे, असे त्यांनी सांगितले.**



सिंधुदुर्ग जिल्हा कृषी व विज्ञान प्रतिष्ठानच्या वतीने उपवनसंरक्षक नवलकिशोर रेड्डी यांची भेट माजी खासदार आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधीर सावंत यांच्या शिष्टमंडळाने घेतली. यावेळी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष प्रदीप सावंत, सचिव शांताराम राव राणे, शास्त्रज्ञ डॉ. विलास सावंत, बाळकृष्ण गावडे, सुयश राणे, कर्मचारी अब्दुल शेख, दीपक सावंत गावकर आदी उपस्थित होते.यावेळी सुधीर सावंत यांनी उपवनसंरक्षक रेड्डी यांच्याकडे वन्य प्राण्यांच्या त्रासाबद्दल कैफियत मांडली. उपवनसंरक्षक रेड्डी यांनी माकडांचा बंदोबस्त केल्याचे सांगितले, मात्र वन्य प्राण्यांना मारण्याचा किंवा नसबंदी करण्याचा अधिकार वन कायद्याने दिलेला नसल्याचे आणि यासाठी मार्गदर्शन प्रस्ताव पाठवल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वन्य प्राण्यांमुळे शेती आणि बागायतीचे मोठे नुकसान होत असून, शेतकऱ्यांवर वन्य प्राणी हल्ला करत आहेत. यावर हस्तक्षेप करण्याची मागणी केली असता, वन कायद्यात बदल होणे आवश्यक असल्याचे आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले गेले पाहिजेत असे मत श्री सावंत यांनी व्यक्त केले.यावर बोलताना सुधीर सावंत म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारने उद्ध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी वन कायदे आणि वन यांचे संशोधन करून शेतकरी आणि शेतीवरील हल्ला कसा थांबवता येईल, याबाबत तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. वन, कृषी आणि ग्रामविकास खात्याने देखील आपली भूमिका आणि धोरण ठरवावे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी याबाबत स्वतंत्र धोरण (पॉलिसी) निर्माण व्हावी अशी आपण मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.जंगली प्राणी शेती आणि शेतकऱ्यांवर हल्ला करत आहेत, हा उपद्रव थांबला पाहिजे. माकडांचा उपद्रव नियंत्रित करण्यासाठी नसबंदी करून त्यांना जंगलात सोडले पाहिजे, अशी मागणी आपण केली असल्याचे सावंत यांनी सांगितले.

गवारेडे यांची टोळी थांबवण्यासाठी सौर ऊर्जा कुंपण (सोलर फेन्सिंग) करण्याची गरज असून, हे सौर ऊर्जा कुंपण प्रत्येक ग्रामपंचायतीला अनुदान देऊन केले जावे, जेणेकरून गावाच्या शेती व बागायतीचे संरक्षण होईल. हत्ती पकड मोहीम राबवायची झाल्यास महाराष्ट्रात प्रशिक्षित हत्ती आणि साधनसामग्री उपलब्ध नाही. ही साधने तयार केली पाहिजेत आणि सरकारने यासाठी तातडीने उपाययोजना आखण्याची गरज आहे असेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना शेती-बागायतीची नुकसानभरपाई देणे हा एकमेव पर्याय नाही.

### कृषी खात्याने पुढाकार घेतला पाहिजे

शेतकरी आणि त्यांच्या पिकांचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. यासाठी वन, ग्रामविकास आणि कृषी खात्याने पुढाकार घेतला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. वन्य प्राण्यांना पकडणे आणि मारण्याचे कायद्याने अधिकार दिलेले नसल्याने, या वन्य प्राण्यांच्या बाबतीत शेतकरी आणि शेतीचे संरक्षण करण्यासाठी सरकारने आता तातडीने निर्णय घेतले पाहिजेत. जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतींना सौर ऊर्जा कुंपणासाठी निधी दिला पाहिजे आणि ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार ते मंजूर व्हायला पाहिजे. यासाठी आपण वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेणार असून, मुख्यमंत्र्यांना देखील भेटून याबाबत उपाययोजना करण्याबाबत मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भाजपने कर्जमाफीचे आश्वासन दिलेच नव्हते!

## अतुल सावे यांनी पत्रकारांच्या बैठकीत बोलताना दिली माहिती

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**विधानसभा निवडणुकी दरम्यान पक्षाने कर्जमाफीवर कोणतेही आश्वासन दिले नव्हते. जाहीरनामा नीट तपासून बघा. मुख्यमंत्री व बच्चू कडू यांची लवकरच भेट होईल आणि कर्जमाफीच्या प्रश्नावर चर्चा होणार असल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी पत्रकारांच्या बैठकीत बोलताना दिली.**



राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दुग्धविकास व दिव्यांग कल्याणमंत्री अतुल सावे यांनी शनिवारी हिंगोलीत पत्रकारांची बैठक घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात देशात काय प्रगती झाली, याची माहिती दिली. या वेळी त्यांनी विकसित भारत, सेवा सुशासन, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, आयुष्यमान योजना, भारत-पाकिस्तान युद्धानिमित्त ऑपरेशन सिंदूर आदी विषयांवर माहिती दिली. आमदार तान्हाजी मुटकुळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार गजानन घुगे, फुलाजी शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर आदींची उपस्थिती होती. या वेळी झालेल्या पत्रकारांच्या बैठकीत पत्रकारांनी, शेतकऱ्यांच्या कर्जमाफी प्रश्नावर बच्चू कडू यांचे उपोषण सुरू आहे. भाजपने निवडणूक काळात कर्जमाफी देऊ, अशी घोषणा केली होती. त्या कर्जमाफीच्या प्रश्नाचे काय, असा प्रश्न केला असता, पक्षाने कर्जमाफीचे आश्वासन दिले नव्हते, असे म्हणत सावे यांनी पत्रकारांना जाहीरनामा काढून बघावा, असे म्हटले.

बच्चू कडू यांची भेट घेतली. त्यांच्यात चर्चा झाली. मुख्यमंत्री व बच्चू कडू यांची लवकरच भेट होईल, असे सावे म्हणाले. आणि कर्जमाफीच्या प्रश्नावर चर्चेअंती मुख्यमंत्री निर्णय घेतील, असे सावे म्हणाले.विधानसभा निवडणुकी दरम्यान पक्षाने कर्जमाफीवर कोणतेही आश्वासन दिले नव्हते. जाहीरनामा नीट तपासून बघा. मुख्यमंत्री व बच्चू कडू यांची लवकरच भेट होईल आणि कर्जमाफीच्या प्रश्नावर चर्चा होणार असल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी पत्रकारांच्या बैठकीत बोलताना दिली.

### जाहीरनामा काढून बघावा

वेळी झालेल्या पत्रकारांच्या बैठकीत पत्रकारांनी, शेतकऱ्यांच्या कर्जमाफी प्रश्नावर बच्चू कडू यांचे उपोषण सुरू आहे. भाजपने निवडणूक काळात कर्जमाफी देऊ, अशी घोषणा केली होती. त्या कर्जमाफीच्या प्रश्नाचे काय, असा प्रश्न केला असता, पक्षाने कर्जमाफीचे आश्वासन दिले नव्हते, असे म्हणत सावे यांनी पत्रकारांना जाहीरनामा काढून बघावा, असे म्हटले. भाजप प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष बावनकुळे यांनी नुकतीच बच्चू कडू यांची भेट घेतली. त्यांच्यात चर्चा झाली. मुख्यमंत्री व बच्चू कडू यांची लवकरच भेट होईल, असे सावे म्हणाले. आणि कर्जमाफीच्या प्रश्नावर चर्चेअंती मुख्यमंत्री निर्णय घेतील, असे सावे म्हणाले. विधानसभा निवडणुकी दरम्यान पक्षाने कर्जमाफीवर कोणतेही आश्वासन दिले नव्हते. जाहीरनामा नीट तपासून बघा. मुख्यमंत्री व बच्चू कडू यांची लवकरच भेट होईल.

# विमान दुर्घटनेनंतर सरकार अलर्ट!

## डीजीसीएने घेतला मोठा निर्णय, एअर इंडियाने दिला इशारा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अहमदाबादमधील एअर इंडियाच्या विमान अपघातात २६५ पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर संपूर्ण देशभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर केंद्र सरकार अलर्ट झालं असून पुन्हा अशा स्वरुपाच्या घटना घडू नये, यासाठी आता पावलं उचलले जात आहेत. या पार्श्वभूमीवरच आता डीजीसीएने महत्वाचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. डीजीसीएच्या आदेशानुसार आता बोईंग ७८७ ड्रीमलायनर या विमानांची उड्डाणपूर्वी संपूर्ण सुरक्षा तपासणी अनिवार्य करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.**




नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) दिलेल्या या आदेशानंतर बोईंग ७८७ विमानांच्या अनिवार्य सुरक्षा तपासणी सुरु करण्यात आल्याचं एअर इंडियाने म्हटलं आहे. त्यामुळे एअर इंडियाने विमानांच्या विलंबाचा इशारा देखील दिला आहे. डीजीसीएने निर्देशित केलेल्या सुरक्षा तपासणी पूर्ण करण्याच्या प्रक्रियेत एअरलाईन्स असून पुढील ऑपरेशन्ससाठी परवानगी देण्यापूर्वी बोईंग ७८७ विमानांची ही तपासणी केली जात असल्याचं एअर इंडियाने म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. दरम्यान, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने जेनएक्स इंजिनने चालणाऱ्या सर्व ड्रीमलाइनर्सची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये विमानांच्या उड्डाणपूर्वी संपूर्ण सुरक्षा तपासणी, इंधन पॅरामीटर देखरेख आणि संबंधित सिस्टमची तपासणी, केबिन एअर कॉम्प्रेसर आणि संबंधित सिस्टमची तपासणी, इलेक्ट्रॉनिक इंजिन नियंत्रण प्रणाली चाचणी, हायड्रॉलिक सिस्टमची तपासणी, टेक-ऑफ पॅरामीटर्सची तपासणी करण्याचे निर्देश डीजीसीए दिले आहेत. डीजीसीएने दिलेल्या आदेशानंतर बोईंग ७८७ विमानांची सुरक्षा तपासणी करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. पुढील ऑपरेशनससाठी परवानगी देण्यापूर्वी बोईंग ७८७ विमानांच्या ताफ्यातील विमानांची तपासणी भारतात परतताना केली जात आहे. एअर इंडियाने बोईंग ७८७ या विमानांपैकी नऊ विमानांची आतापर्यंत तपासणी पूर्ण केली आहे. तसेच उर्वरित २४ विमानांसाठी डीजीसीएने दिलेल्या वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे या तपासणीसाठी वेळ वाढू शकतो आणि काही लांब पल्ल्याच्या मार्गावर विशेषतः ऑपरेटिंग कर्फ्यू असलेल्या विमानतळांवर संभाव्य विलंब होऊ शकतो. त्यामुळे कोणत्याही विलंबाबद्दल ग्राहकांना योग्यरित्या सूचित केलं जाईल. तरी विमानतळावर जाण्यापूर्वी त्यांनाया संकेतस्थळावर त्यांच्या फ्लाइटची स्थिती तपासण्याचा सल्ला देण्यात येत आहे. या व्यत्ययामुळे प्रभावित झालेल्या ग्राहकांना एअर इंडिया रद्द केलेल्या विमानांचे संपूर्ण पैसे परत करत आहे. तसेच मोफत रीशेड्युलिंग ऑफर दिली जात आहे", असं एअर इंडियाने एक्सवर म्हटलं आहे.नागरी विमान वाहतूक सचिव समीर कुमार सिन्हा यांनी सांगितलं की, "१२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेलं एअर इंडियाचं विमान हे ६५० फूट उंचीवर गेलं होतं. विमानाच्या पायलटने दुपारी १:३९ वाजता (एटीसीला मेडे कॉल केला होता. एटीसीनुसार जेव्हा त्यांनी विमानाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तेव्हा कोणताही प्रतिसाद मिळाला

### एअर इंडियाने काय म्हटलं?

अगदी एका मिनिटात रिप्लाय गेला होता पण तरीही प्रतिसाद मिळाला नाही. विमानतळापासून सुमारे २ किमी अंतरावर असलेल्या मेघानी नगरमध्ये हे विमान कोसळलं. तसेच १२ जून रोजी घडलेल्या अपघातापूर्वी याच विमानाने पॅरिस-दिल्ली-अहमदाबाद सेक्टर उड्डाण कोणत्याही अडचणीशिवाय पूर्ण केलं होतं", असं समीर कुमार सिन्हा यांनी म्हटलं.गेल्या दोन दिवसांपासून परिस्थिती अत्यंत कठीण होती. अहमदाबाद विमानतळाजवळ झालेल्या अपघाताने संपूर्ण देशाला हादरवून टाकलं आहे. ज्या कुटुंबातील सदस्यांनी त्यांचे प्रियजन गमावले त्यांच्याबद्दल माझ्या तीव्र संवेदना आहेत. या घटनेत ज्यांनी त्यांचे प्रियजन गमावले आहेत.

# तर २००० लोकांचा मृत्यू झाला असता!

## अहमदाबाद विमान अपघाताची प्रत्यक्षदर्शीने व्यक्त केली भीती

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अहमदाबादमध्ये १२ जून रोजी झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातात २६५ पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला आहे. एअर इंडियाचं हे विमान अहमदाबाद विमानतळावरून लंडनला जाण्यासाठी निघालं होतं. मात्र, उड्डाण केल्यानंतर एअर इंडियाचं बोईंग ७८७ ड्रीमलायनर हे विमान काही वेळातच एका वसतिगृहावर कोसळलं आणि मोठा स्फोट झाला. या घटनेनंतर संपूर्ण देशभरात हळहळ केली जात आहे.**




अहमदाबाद विमान अपघाताच्या घटनेनंतर आता एका प्रत्यक्षदर्शी युवकाने या घटनेचं धक्कादायक वास्तव सांगितलं आहे. अहमदाबादमधील बीजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या इमारतीवर हे विमान कोसळलं. मात्र, वसतिगृहावर न कोसळता हे विमान दुसरीकडे एखाद्या निवासी भागात कोसळलं असतं तर तब्बल १,५०० ते २,००० लोकांचा मृत्यू झाला असता एवढी भीषणता या अपघाताची होती असं धक्कादायक वास्तव एका प्रत्यक्षदर्शी व्यक्तीने सांगितलं आहे. एअर इंडया विमान अपघाताची घटना पाहणाऱ्या एका स्थानिक प्रत्यक्षदर्शी व्यक्तीने सांगितलं की, "जर हे विमान निवासी भागात कोसळलं असतं तर १,५०० ते २,००० लोकांचे प्राण गेले असते. मात्र, त्या विमानाच्या पायलटने दाखवलेल्या समयसूचकतेमुळे आणखी मोठी दुर्घटना टळली असं म्हणता येईल. हा अपघात झाला तेव्हा आम्ही क्रिकेट खेळत होतो. विमान अगदी आमच्या वरतून पुढे गेलं, ते खूप जवळ दिसत होतं, असं या घटनेचे साक्षीदार असलेल्या एका स्थानिक रहिवाशाने सांगितलं. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे.दरम्यान, प्रत्यक्षदर्शी व्यक्तीने असंही म्हटलं की, "हे विमान अचानक खाली येताना दिसत होतं. तसेच पुढे जाऊन हे विमान कोसळलं तेव्हा स्फोटाचा मोठा कर्कश आवाज ऐकू आला आणि स्फोटानंतर अवकाशात आगीच्या मोठ्या प्रमाणात ज्वाळा दिसून आल्या. त्यानंतर मोठा गोंधळ उडाला होता.

### मंत्रालयाने काय म्हटलं?

आम्ही घटनास्थळी धाव घेतली. हे विमान निवासी वस्तीपासून थोड्या अंतरावर कोसळलं. या घटनेत पायलटने समयसूचकता दाखवली त्यामुळे पायलटला सलाम अन्यथा आणखी मोठी दुर्घटना झाली असती, असं विमान अपघाताच्या प्रत्यक्षदर्शी असलेल्या एका व्यक्तीने सांगितलं.नागरी विमान वाहतूक सचिव समीर कुमार सिन्हा यांनी सांगितलं की, "१२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेलं एअर इंडियाचं विमान हे ६५० फूट उंचीवर गेलं होतं. मात्र, त्यानंतर ते विमान खाली आलं आणि अगदी एका मिनिटानंतर वैद्यकीय वसतिगृह संकुलात कोसळलं. विमानाच्या पायलटने दुपारी १:३९ वाजता (१२ जून) एटीसीला मेडे कॉल केला होता.

# ‘प्रेमाची गोष्ट’ बंद होणार?




‘स्टार प्रवाह’ वाहिनीवर ‘प्रेमाची गोष्ट’ ही मालिका सप्टेंबर २०२३ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. या मालिकेमधून अभिनेत्री तेजश्री प्रधानने छोट्या पडद्यावर कमबॅक केलं होतं. पहिल्या दिवसांपासून ही मालिका टीआरपीच्या शर्यतीत कायम टॉप-५ मध्ये असायची. याशिवाय ‘प्रेमाची गोष्ट’ मालिकेचा ऑनलाइन टीआरपी सुद्धा चांगला होता.मात्र, जानेवारी २०२५ मध्ये तेजश्री प्रधानने अचानक ‘प्रेमाची गोष्ट’ मालिकेतून एक्झिट घेतली. तिच्या एक्झिटनंतर अभिनेत्रीच्या सगळ्याच चाहत्यांना धक्का बसला होता. याबद्दल सोशल मीडियावर बरीच चर्चा झाली, याशिवाय प्रेक्षकही कमेंट्स सेक्शनमध्ये नाराजी व्यक्त करत होते. याचा फटका ‘प्रेमाची गोष्ट’ मालिकेच्या टीआरपीला बसला.‘प्रेमाची गोष्ट’ मालिकेचा टीआरपी कमी झाल्याने ही मालिका फेब्रुवारी महिन्यात सुरुवातीला साडेसहा वाजता प्रसारित केली जाऊ लागली. मात्र, त्यानंतर या सीरियलचा संध्याकाळचा स्लॉट देखील बदलण्यात आला आणि सध्या ‘प्रेमाची गोष्ट’ ही मालिका दुपारी १ वाजता प्रसारित केली जाते. आता लवकरच ही मालिका सर्वांचा निरोप घेण्याची दाट शक्यता आहे.‘स्टार प्रवाह’ वाहिनीने काही दिवसांपूर्वीच समृद्धी केळकर आणि अभिषेक रहाळकर यांच्या नव्या मालिकेची घोषणा केली होती. या मालिकेच्या प्रदर्शनाची तारीख अन् वेळ नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. समृद्धी केळकरची नवीन मालिका ७ जुलैपासून दुपारी १ वाजता प्रसारित केली जाईल. याच वेळेला सध्या ‘प्रेमाची गोष्ट’ ही मालिका प्रक्षेपित केली जाते. यामुळेच नवी मालिका सुरू होण्यापूर्वी ‘प्रेमाची गोष्ट’ मालिका सर्वांचा निरोप घेईल असा अंदाज व्यक्त केला जात आहेत.

# अनिताचं एजाजबरोबरचं ब्रेकअप!

अभिनेत्री अनिता हसनंदानी तिच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असते. २०१३ मध्ये तिने रोहित रेड्डीशी लग्न केलं. अनिता आता एका मुलाची आई आहे आणि आनंदी जीवन जगत आहे. अनिताचं अभिनेता एजाज खानबरोबरचं रिलेशनशिप आणि ब्रेकअपदेखील चर्चेत राहिले आहे. दोघांची भेट ‘काव्यांजली’ शोच्या सेटवर झाली. येथून त्यांची मैत्री फुलली आणि नंतर या मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. अनिता हसनंदानीने अलीकडेच २००७ मध्ये ‘काव्यांजली’चा सह-अभिनेता एजाज खानबरोबरच्या तिच्या बहुचर्चित नात्याबद्दल आणि त्यानंतरच्या ब्रेकअपबद्दल उघडपणे सांगितले. कोणताही पश्चात्ताप नसल्याची कबुली देताना तिने सांगितले की, जोडीदाराने तुम्हाला जसे आहात तसे स्वीकारले पाहिजे. बघा, मी खूप काही शिकले. मी एक चांगला माणूस झाले. मला वाटतं आम्ही दोघे खूप चांगले लोक होतो, पण एकमेकांसाठी चांगले नव्हतो. मला फक्त एकाच गोष्टीची खंत आहे की मी माझ्या पहिल्या कारकिर्दीला सोडून दिले. मला ‘वर्षम’ (२००४) नावाचा एक चित्रपट ऑफर करण्यात आला होता, जो एक मोठा तमिळ हिट चित्रपट होता आणि मी तो केला नाही. त्याच्यामुळे नाही, मला तो करायचा नव्हता कारण मला खात्री नव्हती की तो त्या चित्रपटासाठी होकार देईल. त्याने मला कधीही थांबवले नाही. मी काही वाईट करिअरच्या हालचाली केल्या, पण त्याशिवाय कोणताही पश्चात्ताप नाही. तेच जीवन आहे. हृदय तुटते, ब्रेकअप होतो, काहीही असो, तुम्ही प्रत्येक नात्यातून शिकता,” सिद्धार्थ कन्ननला अनिता हसनंदानीने सांगितले.हटरफ्लाय’ला दिलेल्या मुलाखतीत अनिता हसनंदानीने एक्स बॉयफ्रेंड एजाज खानबरोबरच्या तिच्या नात्याबद्दल सांगितले. ती म्हणाली, “हे माझ्या आयुष्यातील लाँग रिलेशनशिप होते. कारण आमच्या संस्कृती पूर्णपणे वेगळ्या होत्या. तो मुस्लीम होता आणि मी हिंदू. आईने स्पष्टपणे नकार दिला नाही, पण ती नेहमीच काळजीत असायची.



# सना ऑटोइम्यून हेपेटायटीसने ग्रस्त

बिग बॉस ओटीटी ३’ची विजेती आणि लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री सना मकबूलचा काही दिसांपुर्वी एक फोटो समोर आला होता, ज्यामध्ये ती रुग्णालयात दाखल असल्याचे दिसून आले होते. सनाच्या एका मैत्रिणीने तिचा हॉस्पिटलमधील फोटो शेअर केल्यानंतर अनेक चाहत्यांनी सनाबद्दल चिंता व्यक्त केली होती. परंतु तेव्हा सनाने तिच्याबद्दल काही माहिती दिली नव्हती. अशातच आता एका मुलाखतीत सनाने सांगितले की, तिला लिव्हर सिरोसिस सारख्या गंभीर आजाराने ग्रासले आहे.हिंदुस्तान टाईम्सला दिलेल्या मुलाखतीत सना म्हणाली, “मी गेल्या काही काळापासून ऑटोइम्यून हेपेटायटीसने ग्रस्त आहे, पण परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. माझी रोगप्रतिकारक शक्ती यकृतावर परिणाम करु लागली आणि आता मला लिव्हर सिरोसिसचे निदान झाले आहे. या कठीण काळात मी खंबीर राहण्याचा प्रयत्न करत आहे. आता माझी इम्युनोथेरपी सुरू झाली आहे आणि मी माझ्या बरं होण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.”यापुढे ती म्हणाली, “डॉक्टर आणि मी यकृत प्रत्यारोपण टाळण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करत आहोत. मी इम्युनोथेरपी सुरू केली आहे आणि हे खूप थकवणारं आहे. मला फक्त यकृत प्रत्यारोपणासारख्या मोठ्या गोष्टीची आवश्यकता पडू नये हीच माझी इच्छा आहे. मी इतक्या सहजपणे हार मानण्यास तयार नाही. उपचार हा एक प्रवास आहे आणि मी यात जशी जशी पुढे जात आहे.




# मुंबई मेट्रोत दिसला हृतिक

बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन हा नेहमी चर्चेत असतो. तो त्याच्या चित्रपटांमुळे कमी अन् वैयक्तिक आयुष्यामुळे लाईमलाइटमध्ये राहतो. हृतिक त्याच्या दमदार अभिनयासाठी प्रसिद्ध आहे. हृतिक रोशन सध्या त्याच्या आगामी 'फायटर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हृतिकचे चाहते देखील या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान हृतिकचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. या व्हायरल व्हिडिओत हृतिक मुंबई मेट्रोमध्ये प्रवास करताना दिसत आहे. हृतिक रोशन शुक्रवारी मुंबई मेट्रोमध्ये प्रवास करताना अचानक दिसल्याने लोकांना

# गोविंदाबरोबर वरुण धवनची तुलना करू नका!

प्रसिद्ध अभिनेता गोविंदाची पत्नी सुनीता आहुजा हल्ली खूप चर्चेत असतात. अनेकदा त्या इंडस्ट्रीतील लोकांबद्दल, तर कधी गोविंदाबद्दलही स्पष्ट वक्तव्य करत असतात. अशातच आता नुकतच सुनीता यांनी एका मुलाखतीमध्ये बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेता वरुण धवनबद्दल वक्तव्य केलं आहे. सुनीता यांनी गोविंदाबरोबर वरुण धवनची तुलना करू नका असं म्हटलं आहे. सुनीता आहुजा यांनी दिलेल्या मुलाखतीमध्ये



वरुण धवनबद्दल वक्तव्य केलं आहे. गोविंदा व वरुण धवन यांच्याबद्दल अनेकदा प्रेक्षकांमध्ये चर्चा केली जाते. गोविंदा हा वरुण धवनच्या आवडत्या अभिनेत्यांपैकी एक आहे, असं वरुणनेच एका मुलाखतीमध्ये म्हटलं होतं. अशातच आता सुनीता यांनी वरुण धवन व गोविंदा यांच्यामध्ये होणाऱ्या तुलनेबद्दल वक्तव्य केलं आहे. ‘इन्स्टंट बॉलीवूड’ला दिलेल्या मुलाखतीमध्ये सुनीता यांना “वरुण धवनला एका मुलाखतीमध्ये एका कलाकाराचं आयुष्य तुला जगायचं असेल तर तो कोण असेल असा प्रश्न विचारला गेला होता; यावर वरुणने गोविंदाचं नाव घेतलं होतं, कारण वरुण धवन गोविंदाचा खूप मोठा चाहता आहे.

# 27 वर्षांनंतर आफ्रिकेचा विजय!

## विजयानंतर भावुक झाला महाराज, रडतच दिली मुलाखत

। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दक्षिण आफ्रिकेने चोकर्सचा टॅग बाजूला सारत २७ वर्षांनी आयसीसी ट्रॉफीचं जेतेपद पटकावलं आहे. दक्षिण आफ्रिकेचे हे दुसरे आयसीसी जेतेपद आहे. या संघाने यापूर्वी १९९८ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीच्या रूपात पहिले आयसीसी जेतेपद जिंकले होते. ऑस्ट्रेलियाने WTC फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी २८२ धावांचे कठीण लक्ष्य ठेवले होते. दक्षिण आफ्रिकेने चौथ्या दिवशी ५ विकेट गमावून हे लक्ष्य गाठले. संघाच्या विजयानंतर भारतीय वंशाचा केशव महाराजला अश्रू अनावर झाले होते.**



दक्षिण आफ्रिका चॅम्पियन होताच आफ्रिकन संघात आनंदाची लाट उसळली. ड्रेसिंग रूममध्ये बसलेल्या सर्व खेळाडूंनी एकमेकांना मिठी मारली. दरम्यान संघाचा फिरकी गोलंदाज केशव महाराज आपल्या संघाच्या या ऐतिहासिक विजयानंतर भावूक झाला आणि त्याला आपले अश्रू आवरता आले नाहीत. माजी कर्णधार ग्रॅमी स्मिथशी बोलताना केशव महाराजला रडू कोसळलं आणि जड आवाजातच त्याने पूर्ण मुलाखत दिली.दक्षिण आफ्रिकेच्या चॅम्पियन होण्याबद्दल केशव महाराज म्हणाला, खूप स्पेशल आहे, ही ट्रॉफी उंचावणं सर्वांसाठीच आणि देशासाठी खूप मोठी अभिमानाची गोष्ट आहे. हे अश्रूदेखील आता आमच्या काय भावना आहेत ते सांगू शकणार नाहीत. गेल्या ५ दिवसांमध्ये सर्वांमधील ही एकता आणि आमचा देशही याचसाठी ओळखला जातो. एक संघ म्हणून, एक राष्ट्र म्हणून, एक अभिमानी देश म्हणून आम्ही खूप आभारी आहोत. चाहत्यांचे आभार मानताना तो म्हणाला की, मी जर फलंदाजीला गेलो असतो माझ्यातील भावना अधिक मोकळेपणाने मांडू शकलो असतो. आम्हाला पाठिंबा देणाऱ्या सर्व चाहत्यांचे आभार, प्रतिकूल परिस्थितीतही आम्ही खंबीरपणे उभे राहिलो. भविष्यात अजून कमालीच्या गोष्टींकडे हे एक मोठे पाऊल असेल अशी आशा आहे.२०२५ च्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेने २८२ धावांचे लक्ष्य गाठले. आयसीसी फायनलमध्ये यशस्वीरित्या गाठलेले हे सर्वोच्च लक्ष्य आहे. यापूर्वी हा विक्रम टीम इंडियाच्या नावावर होता. २०११ च्या वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाने श्रीलंकेविरुद्ध २७५ धावांचे लक्ष्य गाठले होते.लॉर्ड्सच्या मैदानावर झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. गेल्या २७ वर्षांत जे कोणालाच जमलं नव्हतं ते तेंबा बावूमाच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या दक्षिण आफ्रिका संघाने करून दाखवलं आहे. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलिवावर ५ गडी राखून विजय मिळवला. तेंबा बावूमा हा दक्षिण आफ्रिकेला घ्या. ऐतिहासिक लॉर्ड्सच्या मैदानावर झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २८२ धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला.

### विजयानंतर तेंबा बावूमा काय म्हणाला?

दोन्ही संघांमध्ये तोडीस तोड खेळ पाहायला मिळाला. ऑस्ट्रेलियाकडून स्टीव्ह स्मिथ, पॅट कमिन्स आणि मिचेल स्टार्क यांनी बहुमूल्य योगदान दिलं. मात्र, कर्णधार तेंबा बावूमा, एडेन मारक्रम आणि गोलंदाजीत कगिसो रबाडा यांनी केलेली कामगिरी विशेष ठरली.हा विजय दक्षिण आफ्रिकेसाठी अतिशय खास आहे. या विजयानंतर बोलताना तेंबा बावूमा म्हणाला, " गेले काही दिवस आमच्यासाठी खूप खास होते. काही क्षणासाठी आम्हाला वाटलं होतं की, आम्ही दक्षिण आफ्रिकेतच आहोत. आम्ही खूप मेहनत घेतली आणि खूप विश्वासाने इथे आलो होतो. आम्ही आमच्यावर शंका घेण्याऱ्यांचाही सामना केला. पण, आम्ही उत्तम खेळ केला याचा आम्हाला आनंद आहे. हा क्षण आमच्यासाठी आणि आमच्या देशवासियांसाठी अतिशय खास आहे."यासह तेंबा बावूमाने संघातील प्रमुख वेगवान गोलंदाज कगिसो रबाडाचंही कौतुक केलं. त्याचं कौतुक करताना तेंबा बावूमा म्हणाला, " कगिसो रबाडा आमच्या संघातील अतिशय महत्वाचा खेळाडू आहे.

## ऑस्ट्रेलियाचा पराभव कुणामुळे झाला?

## पॅट कमिन्सने सांगितलं दारूण पराभवाचं कारण

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियावर ५ गडी राखून विजयाची नोंद केली. हा विजय दक्षिण आफ्रिकेसाठी अतिशय खास ठरला आहे. कारण गेल्या २७ वर्षांत दक्षिण आफ्रिकेला आयसीसीची एकही ट्रॉफी जिंकता आली नव्हती.**

त्यामुळे दक्षिण आफ्रिकेसाठी हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. तर दुसरीकडे ऑस्ट्रेलियाने सलग दुसऱ्यांचा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप जिंकण्याची संधी गमावली. दरम्यान या पराभवानंतर काय म्हणाला ऑस्ट्रेलियाचा कर्णधार? जाणून घ्या.या पराभवानंतर बोलताना ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स म्हणाला, " गोष्टी खूप लवकर बदलू शकतात, पण दुर्दैवाने आमच्यासाठी हे थोडं अवघड होतं. आम्हाला पहिल्या डावात चांगली आघाडी मिळाली होती. आम्ही त्यांना सामन्यातून बाहेर ठेवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण तसं होऊ शकलं नाही.
गेली दोन वर्ष सर्वकाही चांगलं होतं. पण या सामन्यात तसं काही घडलं नाही."पॅट कमिन्सने विरोधी संघातील खेळाडू एडेन मारक्रमचं कौतुक केलं. तो म्हणाला, " या सामन्यात नॅथन लायन धोकादायक ठरू शकला असता, पण त्याला विकेट मिळाली नाही. एडेनने अप्रतिम खेळी केली. दक्षिण आफ्रिका संघ खऱ्या अर्थाने विजेता ठरला आहे. त्यांनी स्वतःला शेवटपर्यंत सामन्यात टिकवून ठेवलं आणि संधी मिळताच संधीचं सोनं केलं."या सामन्याबद्दल बोलायचं झालं तर, पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाला २१२ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून स्टीव्ह स्मिथने ६६ तर बेवस्टरने सर्वाधिक ७२ धावांची खेळी केली. या धावांच्या प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेला १३८ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ७४ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाला हवी तशी सुरूवात करता आली नाही. अवघ्या ७३ धावांवर दक्षिण आफ्रिकेचे ७ फलंदाज तंबूत परतले होते. शेवटी मिचेल स्टार्कने अर्धशतकी खेळी करत संघाची धावसंख्या २०० पार पोहोचवली. दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकण्यासाठी २८२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना एडेन मारक्रमन शतकी आणि बावूमाने अर्धशतकी खेळी करत संघाला ५ गडी राखून विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेसाठी हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. तर दुसरीकडे ऑस्ट्रेलियाने सलग दुसऱ्यांचा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप जिंकण्याची संधी गमावली.




### गोष्टी खूप लवकर बदलू शकतात

दरम्यान या पराभवानंतर काय म्हणाला ऑस्ट्रेलियाचा कर्णधार? जाणून घ्या.या पराभवानंतर बोलताना ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स म्हणाला, " गोष्टी खूप लवकर बदलू शकतात, पण दुर्दैवाने आमच्यासाठी हे थोडं अवघड होतं. आम्हाला पहिल्या डावात चांगली आघाडी मिळाली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
। दि. 15 जून 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ‘निर्भय कन्या’ अभियानामधून

# आत्मविश्वासातून व्यक्तिमत्व विकास करा- दीपक शहा

## शिक्षण विश्व: प्रतिभा महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न



। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शैक्षणिक अध्यापनाबरोबरच व्यवहारिक जगामध्ये वावरण्यासाठी आत्मविश्वास, व्यक्तिमत्व विकास आणि भाषेवर प्रभुत्व असणे गरजेचे आहे. यातून आपण जगासमोर “प्रेझेंटेबल” होतो. त्यामुळे परीक्षा, नोकरी, मुलाखत या सर्व गोष्टींसाठी आत्मविश्वासातून व्यक्तिमत्व विकास करा असा सल्ला कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा यांनी दिला.**

चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील एस. वाय. व टी. वाय. वर्गातील विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास, समूह चर्चा ,नोकरीसाठी अर्ज कसा करावा, मुलाखत कशी द्यावी, बौद्धिक चाचणीला कशाप्रकारे सामोरे जावे, व्यक्तिमत्व विकास, भाषेवर प्रभुत्व कसे मिळवावे आधी विषयावर एक सप्ताहाची पूर्ण वेळ कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

प्रतिभा महाविद्यालय व स्मार्ट टँक एज्युकेशन (इन्फोसिस ) जी टी टी बार्क्लेज यांच्या झालेल्या सामंजस्य करारानुसार कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. त्यात विविध क्षेत्रातील 15 तज्ञ प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले. त्यांच्या अनेक प्रश्नांची समर्पक उत्तरे यावेळी तज्ञ प्रशिक्षकांनी दिले.=

समारोप कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यासपीठावरती कमला एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका तेजल शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, प्रभारी प्राचार्या डॉ क्षितीजा गांधी , मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समन्विका डॉ. हर्षिता वाच्छानी समावेत विविध विभागाचे प्राध्यापक उपस्थित होते.

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+ NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+ CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+ 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+ TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+ 13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26

ADMISSIONS OPEN

प्रज्ज्वलितो ज्ञानमियो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण









* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292